# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
दूरध्वनी : (०२२) २७५७१६७३, २७५७०१६६, २७५७१६७७.
मेल : estt6mjp@gmail.com


जा.क्र.मजीप्रा-२०२२/प्र.लि./का.अ./प.नि.सु./प्र.क्र.५/आ-३ दिनांक :- ९/०८/२०२३

**म.जी.प्रा.च्या आस्थापनेवरील प्रथम लिपीक यांना कार्यासन अधिकारी/अधीक्षक या पदोन्नतीच्या कोटयातील नियमित रिक्त पदांवर तात्पुरती पदोन्नती.**

## कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक बीसीसी-२०१७/ प्र.क्र.३१२ अ भाग-१/१६-ब, दिनांक २/११/२०१७ अन्वये असे कळविले आहे की, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये, दिनांक २५/५/२००४ या शासन निर्णय रद्द करुन पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे.

२. मा.उच्च न्यायालयाने दिनांक ४/८/२०१७ च्या निर्णयास १२ आठवडयाची स्थगिती दिली होती. दिनांक २८/१०/२०१७ च्या पत्रान्वये सदर स्थगिती कालावधीत पदोन्नती आरक्षण देऊन पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते. हा स्थगिती कालावधी दिनांक २७/१०/२०१७ रोजी संपुष्टात आला आहे. या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयास स्थगिती देण्याच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दिनांक ३०/१०/२०१७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ४/८/२०१७ च्या निर्णयास कोणतीही स्थगिती दिलेली नाही. अथवा परिस्थिती "जैसे थे" ठेवण्याबाबत देखील कोणतेही आदेश दिलेले नाहीत. त्यामुळ शासन निर्णय दिनांक २५/५/२००४ मधील तरतुदीनुसार मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देता येणार नाही. यास्तव, मा.सर्वोच्च न्यायालयात दिनांक १३/११/२०१७ रोजी होणाऱ्या सुनावणीपर्यंत सर्व स्तरावरील पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवण्यात यावी तसेच पदोन्नती संदर्भातील कोणतेही आदेश निर्गमित होणार नाही.

३. त्यानंतर शासन पत्र क्रमांक बीसीसी-२०१७/प्र.क्र.३१२-अ/१६-ब, दिनांक २९/१२/२०१७ अन्वये तुर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरावयाची आहेत.

४. राज्य शासनाने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक ४/८/२०१७ च्या निर्णया विरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ वर अद्याप पर्यंत अंतिम निर्णय झालेला नाही. त्यामुळे सद्यस्थितीत पदोन्नतीच्या कोटयातील बिंदुनामावली तपासून शासन पत्र दिनांक २९/१२/२०१७ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार, केवळ खुल्या प्रवर्गातील पदे शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत भरणे अपेक्षित आहे.

..२..

2023315020Z
3/8/23

Recd 9/8/23

५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ७ मे, २०२१ अन्वये शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक २०/४/२०२१ हा अधिक्रमित करुन मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात यावीत, असे शासन निर्देश आहेत.

६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई दिनांक ७/५/२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनानुसार, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५/५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनुसार भरावयाची आहेत. ही बाब विचारात घेऊन खालील प्रथम लिपीक यांना रुपये रुपये S-१४:३८६००-१२२८००/- या वेतनश्रेणीत कार्यासन अधिकारी/अधीक्षक या पदोन्नतीच्या कोटयातील नियमित रिक्त पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे. सदर पदोन्नत खालील कार्यासन अधिकारी/अधीक्षक यांना नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी तसेच सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने खालील विवरणपत्रातील रकाना क्र.५ मध्ये दर्शविल्यानुसार पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | कार्यरत कार्यालयाचे नांव | पदोन्नतीनंतर पदस्थापनेच्या कार्यालयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्रीम.एस.एस.करंजीकर | म.जी.प्रा. जलव्यवस्थापन विभाग, पनवेल | अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, पनवेल | रिक्त पदी |
| २ | श्री.जी.एस.शिवदे | म.जी.प्रा. विभाग, माणगांव | आस्था-३ म.जी.प्रा.चे मध्यवर्ती कार्यालय, सिडको भवन, नवी मुंबई | रिक्त पदी |
| ३ | श्री.आर.एल.तळपाडे. | मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादे.विभाग, पुणे कार्यालय | अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, पुणे | रिक्त पदी |
| ४ | श्रीम.बी.एम. मागेवाड, | म.जी.प्रा. विभाग, नांदेड | अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, नांदेड | रिक्त पदी |

७. वरील विवरणपत्रातील प्रथम लिपीक यांना कार्यासन अधिकारी/अधीक्षक या संवर्गात खालील अटी/शर्तीच्या अधीन राहून सेवाजेष्ठतेनुसार केवळ कार्यासन अधिकारी/अधीक्षक या पदोन्नतीच्या कोटयातील नियमित रिक्त पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

अ) वरील प्रथम लिपीक यांना कार्यासन अधिकारी/अधीक्षक या पदावर दिलेली तात्पुरती पदोन्नती ही शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ७ मे, २०२१ नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४/८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या

विशेष अनुज्ञा याचिकेच्या (विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७) अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात दिनांक २५/५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनुसार देण्यात येत आहेत.

ब) भविष्यात म.जी.प्रा.ची काही कार्यालये कमी कार्यभारामुळे बंद करावी लागल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव पदावनत करण्याची आवश्यकता भासल्यास कोणतीही नोटीस किंवा पुर्वसुचना न देता कनिष्ठतम कर्मचाऱ्यास "शेवटच्यास प्रथम" (Last come first go) या तत्वानुसार पदावनत करण्यात येईल व त्यांचा कार्यासन अधिकारी/अधीक्षक पदाच्या ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

क) उपरोक्त पदोन्नत कार्यासन अधिकारी/अधीक्षक यांच्या प्रथम लिपीक सवंर्गाच्या सेवाज्येष्ठतेमध्ये काही बदल उद्भवल्यास त्यानुसार, त्यांचे सेवाज्येष्ठतेमध्ये होणारा बदल नोंदवून आवश्यक ती अनुषंगिक पुढील कार्यवाही करण्यात येईल. परिणामी ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

ड) पदोन्नत कार्यासन अधिकारी/अधीक्षक यांनी त्यांचे वेतननिश्चिती संबंधिताचा विकल्प या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याचे आत संबंधित कार्यालयास सादर करावेत. विहीत मुदतीत विकल्प प्राप्त न झाल्यास त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११ (१) (अ) नुसार करावी.

इ) पदोन्नत कार्यासन अधिकारी/अधीक्षक त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे. तसेच सदर पदाचा पदभार स्विकारल्यानंतर त्याचा अनुपालन अहवाल मध्यवर्ती कार्यालय/संबंधित कार्यालयास सादर करावा. पदोन्नत कार्यासन अधिकारी/अधीक्षक यांनी अनधिकृत रजेवर जावू नये. त्यांचे लक्ष सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक सीडीआर-१०८२/२५६७/२८/अकरा, दिनांक ३०.८.१९८२ च्या परिपत्रकाकडे वेधण्यात येत आहे. त्यात दिलेल्या सुचना लक्षात घेऊन नियुक्ती रद्द करण्यासाटी कुठल्याही स्वरुपाची आवेदने सादर केल्यास, ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.

८. पदोन्नत कार्यासन अधिकारी/अधीक्षक यांची पदस्थापना प्रशासकीय कारणास्तव असल्याने, त्यांना नियमानुसार पदग्रहण अवधी व प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील.

1/8/23

(दिपाली देशपांडे सावेडकर)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

- सचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
- मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/औरंगाबाद.
- परिमंडळीय अध्यक्ष तथा अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. परिमंडळ, ठाणे/पुणे/औरंगाबाद
- अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा. मंडळ, पनवेल/पुणे/नांदेड/लातूर.
- उप मुख्य लेखा अधिकारी (१/२), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
- कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. जलव्यवस्थापन विभाग, पनवेल/म.जी.प्रा. विभाग, माणगांव/लातुर.
- उप अभियंता, आय.टी. सेल, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
- कक्ष अधिकारी, आस्थापना-३, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
- पदोन्नत कार्यासन अधिकारी/अधीक्षक
- कार्यालयीन आदेश धारिका.